# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक १४.१०.२०२६ बुधवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १४.१०.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश—१३, तथा विशेष न्यायाधिश पोक्सो कोर्ट, नागपुर, श्री. एन.आर. तळेकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ४१३/२०२५ मधील, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथील अप. क्र. २५९/२०२५ कलम ७४, ३५२, ३५१(२) भा.न्या.सं., सहकलम १२ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी नामे आदेश तुळशिराम वासनिक, वय २५ वर्षे, रा. आयबिएम रोड, मोठ्या मस्जीद जवळ, गिट्टीखदान, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ७४ भा.न्या.सं. व कलम १२ पोक्सो कायद्यान्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येक केसमध्ये २,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २१.०४.२०२५ चे १९.०० वा. ते दि. २२.०४.२०२६ चे ०९.३० वा. चे दरम्यान, यातील आरोपी याने पिडीत १७ वर्षीय मुलीचा हात पकडुन, तीचेसोबत अश्लील वर्तन केले तसेच दुसरे दिवशी सकाळीसुध्दा हात पकडुन, अश्लील वर्तन करून, पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होवुन, तीचा विनयभंग केल्याने पिडीतेच्या आईने आरोपीस थापड मारली असता, आरोपीने फिर्यादीचे आईस शिवीगाळ करून, मारण्याची धमकी दिली. फिर्यादी पिडीत मुलीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २४.०४.२०२५ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन मसपोनि. श्रीमती भोपाळे मॅडम यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती योगीता राऊत मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. व्ही. ठाकुर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. अभिषेक कश्यप, अमीतसिंग, मपोअं. प्रियंका बोंबार्डे यांनी काम पाहिले

**(कामगिरी)**

**१) राणाप्रताप नगर पोलीसांची कामगीरी :— चोरी करणाऱ्या हद्दपार आरोपीस अटक, ०३ गुन्हे उघडकीस.**

पोलीस ठाणे राणाप्रताप नगर हद्दीत प्लॉट नं. ४, गायत्री नगर, आयव्हरी फार्म्स येथील डि.डी. बीस्ट्रो रेस्टॉरंट येथे मॅनेजर पदावर काम करणारे फिर्यादी आशिष शिवराज बागडे, वय ३३ वर्षे हे त्यांचे रेस्टॉरंट येथील पाण्याची मोटार सुरू करण्याकरीता गेले असता, दिनांक ०९.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दि. १०.१०.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने पाण्याचे टाकीतील दोन सबमर्सिबल मोटर पंप एकुण किंमती १९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसुन आले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात राणाप्रताप नगर पोलीसांचे तपास पथक पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सहयोग बिल्डींग, जयताळा रोड येथे एका संशयीत ईसमास काळ्या रंगाचे ॲक्टीवा क्र.

एम.एच ३१ एफ.एम १९७७ सह ताब्यात घेवुन, त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव दुर्गेश शंकर पंचेश्वर, वय २९ वर्षे, रा. गल्ली नं. ९, संत तुकडोजी नगर, सुभाष नगर, नागपुर असे सांगीतले. वाहनाचे कागदपत्रे मागितली असता, त्याने कोणतेही कागदपत्रे सादर केले नाही. त्यास पोलीस ठाणे येथे नेवुन, त्याचा व वाहनाबाबत अभिलेख तपासला असता, नमुद वाहन हे पोलीस ठाणे बजाजनगर येथील चोरीचे गुन्ह्यातील असल्याचे समजले व नमुद आरोपी हा पोलीस उपायुक्त परी.क्र. १ यांचे आदेश क्र. ३७३३/२०२४ अन्वये दिनांक १२.११.२०२४ नुसार ०२ वर्षाकरीता हद्दपार असल्याचे दिसुन आले. अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहनाव्यतीरिक्त पोलीस ठाणे धंतोली हद्दीत मध्यवर्ती कारागृह जवळुन ग्रे पांढऱ्या रंगाची ॲक्टीवा क्र. एम.एच ४० टि २५५९ ही सुध्दा चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणुन त्याचे ताब्यातुन ०१ सबमर्सीबल मोटारपंप, दोन ॲक्टीवा मोपेड असा एकुण ५३,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. शिवाजीराव गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सोनेगांव विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. पंकज बोंडसे, दुपोनि. प्रशांत गिते, पोउपनि. स्वप्नील राऊत, पोहवा. संतोष सोनटक्के, विशेषकुमार गुढेवार, एकनाथ पाटील, दिनेश भोगे, पोअं. प्रविण मसराम, अजय धुर्वे, सचिन तिवारी, आनंद काबलीया, ॲलेक्स डिक्रुज, अश्वीन चौधरी व स्वप्नील करंडे यांनी केली.

**२) सदर पोलीसांची कामगिरी :— कर्कश आवाज उत्पन्न करणारे बुलेटचालकांविरूध्द गुन्हे दाखल. व हद्दपार ईसमास अटक**

**अ)** बुलेटचालक हे त्यांचे बुलेट चे सायलेंसर मध्ये बलदाव करून, मोठे कर्कश फटाके फुटल्यासारखे आवाज करून, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवुन पळुन जातात. अशा प्राप्त माहीतीवरून सदर पोलीसांनी विशेष मोहीम राबवुन, पाठपुरावा करून, तीन बुलेटस्वार यांना ताब्यात घेतले. तीन्ही बुलेटची ध्वनीप्रदुषण बाबत तपासणी करून, पोलीस ठाणे सदर येथे बुलेट क्र. १) एम.एच ३१ ई.एक्स ५५११ २) एम. एच. ४० बि.एम ००२४ ३) एम.एच ३१ ई.आर ८००० यांचे चालकांविरूध्द कलम ५,१५ पर्यावरण संरक्षण कायदा, सह कलम १९८, १९०(२) मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हे दाखल केले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

**नागपुर शहर पोलीसांचे नागरीकांना आवाहन आहे की, वाहनांचे सायलेंसर मध्ये बदल करून, नविन मोठ्या आवाजाचे सायलेंसर लावुन ध्वनी प्रदुषण करणे हा दखलपात्र स्वरूपाचा गुन्हा असुन, गुन्हा सिध्द झाल्यास, त्यामध्ये मा. न्यायालयाकडुन पाच लाख रूपयांपर्यंत दंड होवु शकतो. करीता, असा कोणताही प्रकार करू नये.**

**ब)** दिनांक १४.१०.२०२६ चे ०२.१० वा. चे सुमारास, सदर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, गड्डीगोदाम, सेंट जॉन शाळेजवळ एक इसम पोलीसांना पाहुन पळाल्याने त्याचा पाठलाग करून त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सबॅस्टीन उर्फ शिबु राफेल ॲन्थोनी, वय ३३ वर्षे, रा. जाटतरोडी नं. ३, इंदीरामाता नगर, ईमामवाडा, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. १०/२०२६, दिनांक १४.०८.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सदर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील दोन्हीही कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुशिलसिंह पवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, पोउपनि. निकेतन किल्लेदार, पोहवा. संतोष उपाध्याय, निलेश लोंदे, संदीप शेळके, अमित चेके, नरेश बढेल व पोअं. ज्ञानेश्वर वाकोडीकर यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे हिंगणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १३.१०.२०२६ चे २१.३० वा. ते दि. १४.१०.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, समृध्दी हायवे सर्कल, ११ कि.मी. येथे अशोक ले—लॅण्ड कंपनीचा ट्रक ट्रेलर क्र. यु.पी ७८ के. एन २३९६ हा पोलीसांना पलटी झालेल्या अवस्थेत दिसुन आला. त्यामध्ये लोखंडाचे मोठे पाईप भरलेले होते. ते पाईप रस्त्यावर विस्कळीत पडलेले दिसुन आले. ट्रक चा चालक व सहायक दोघेही केबिनमध्ये अडकलेल्या अवस्थेत होते. क्रेन चे सहायाने लोखंडी पाईप बाजुला करून, केबिनमध्ये दबलेल्या जखमी चालक शैलेंद्रसिंग वेदप्रकाशसिंग, वय ३७ वर्षे, रा. गजफ्फरपुर, नदीया बुजुर्ग, तह. बिल्होर, जि. कानपुर, उत्तर प्रदेश व दुसरा ईसम नामे संजय यादव, वय २९ वर्षे, रा. नवबस्ता, बहुआपुर, संग्रामपुर, जि. कानपुर, उत्तर प्रदेश यांना बाहेर काढुन उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान संजय यादव यास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

ट्रक चालक आरोपी याने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, ट्रक पल्टी झाल्याने, केबीनमध्ये अडकुन सहायक नामे संजय यादव जखमी होवुन मरण पावले. त्यांचे मृत्युस ट्रकचालक कारणीभुत आहे. अशा फिर्यादी महामार्ग पोलीस, पोहवा. ओमप्रकाश नयनसिंग पवार, वय ४३ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. रविकुमार सावतकर ८७८८११०७८४ यांनी ट्रकचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**<u>पोलीस ठाणे पारडी</u> :—** फिर्यादी बसावन राम हलखोरी, वय ४७ वर्षे, रा. दसौती, सोनधी, सौंधीकैमुर, बिहार ह. मु.— उमीया टेक्सटाईल्स, कापसी, भंडारा रोड, नागपुर यांनी पोलीस ठाणे पारडी येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. काजलकुमारी बसावन राम हलखोरी, वय १६ वर्षे ही दिनांक १०.१०.२०२६ चे १७.०० वा. पासुन राहते घरून बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पारडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १३७(२) भा.न्या.सं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—४ फुट ६ इंच, केस—काळे लांब, डोळे—काळे, अंगात— गुलाबी रंगाचा सलवार कमीज व काळ्या रंगाची लॅगीन घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलते. ओळख— ओठावर काळा तीळ आहे.




कु. काजलकुमारी

(ईतर)

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश–१६, नागपुर. | ११/२०२६ | कलम ३५३, १८६, ३२३, ५०४, ५०६ भा.दं.वि. | विष्णु शिवचरण त्रिवेदी, वय ३० वर्षे, रा. एस एम लाईन, कामठी, जि. नागपुर. | २३.१०.२०२६ |

स्वा/–
( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.